C.SCM) 09

№ 000163

D-DTN-J-NSA

# MARATHI

## Paper I

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

***INSTRUCTIONS***

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

## SECTION A

1. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे सुमारे दोनशे शब्दांत लिहा : *20×3=60*

(a) "व्यवहार सौकर्याचे व व्यवहारपूर्तीचे मुख्य साधन म्हणजे भाषा होय" — या विधानाची चर्चा करा.

(b) बोली भाषांचा अभ्यास करतांना प्रादेशिक भूगोलाचा ही अभ्यास भाषाशास्त्रात का करावा लागतो, ते स्पष्ट करा.

(c) मराठीतील विकारी शब्दांचे विविध प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

(d) लोककथांचे विविध प्रकार सांगून मराठीतील प्राणीकथांचे विवेचन करा.

2. मराठी व्याकरणातील प्रयोगव्यवस्था सोदाहरण स्पष्ट करा. *60*

3. तेराव्या शतकातील मराठी भाषेचे विशेष साधार लिहा. *60*

4. "लोकगीते समूहाची निर्मिती असते आणि त्यातून समूहमनाची अभिव्यक्ती झालेली असते" — साधार स्पष्ट करा. *60*

## SECTION B

5. पुढीलपैकी कोणत्याही ***तीन*** प्रश्नांची उत्तरे सुमारे दोनशे शब्दांत लिहा : *20×3=60*

   (a) मध्ययुगीन कालखंडातील अभंग रचनेचे भावकविता या नात्याने महत्त्व विशद करा.

   (b) लोकहितवादी आणि आगरकर यांच्या विचारांचे प्रतिबिंब मराठी साहित्यात कोठे आणि कसे आढळते, त्याची चिकित्सा करा.

   (c) स्वप्नरंजनपरता हा 1920 ते 1945 या कालखंडातील साहित्याचा महत्त्वाचा विशेष होय, या मताची – चिकित्सा कविता या वाङ्मयप्रकाराच्या आधाराने करा.

   (d) दलित आत्मकथनाचे ठळक विशेष सांगून आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराच्या रूढ संकल्पनेपेक्षा व परंपरेपेक्षा दलित आत्मकथा का व कशी वेगळी आहे, ते सांगा.

6. 'लावणी' शब्दाची व्युत्पत्ती सांगून लावणी-वाङ्मयाचे विशेष सोदाहरण वर्णन करा. *60*

7. चरित्रात्मक समीक्षापद्धती आता कालबाह्य झाली आहे असे तुम्हास वाटते का ? साधकबाधक चर्चा करा. *60*

8. मराठी साहित्यात सौंदर्यवादी प्रवृत्ती केव्हा आणि किती प्रमाणात कार्यरत झाल्या, याचे साधार विवेचन करा. *60*